# पुणे प्राईम न्यूज

जनमानसाचा निडर आवाज...

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २५७ | गुरुवार, १६ एप्रिल २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


## संक्षिप्त

### शिरूरमध्ये बेकायदेशीर दत्तक प्रकरणाचा पर्दाफाश

**शिरूर, ता. १५ :** शिरूर येथे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत बेकायदेशीर दत्तक प्रकरण उघडकीस आले असून चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.शिरूर पोलीस स्टेशनमध्ये विविध कलमांअंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. याबाबत बाल संरक्षण अधिकारी शत्रुघ्न रूस्तूम खोकले (वय ३१, रा. आळंदी, पुणे) यांच्या फिर्यादीवरून चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ५ जानेवारी २०२३ ते १३ एप्रिल २०२६ या कालावधीत दुय्यम निबंधक कार्यालय, शिरूर येथे दत्तक प्रक्रियेचे अधिकृत नियम न पाळता नवजात बालिका प्रिशा हिला दत्तक देण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे.या प्रकरणात बालिकेचे पालक सोमनाथ अर्जुन पोटावळे व यशोदा सोमनाथ पोटावळे (रा. तर्डोबाची वाडी, ता. शिरूर) यांनी संबंधित कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता बालाजी अणासाहेब जाधव व सुलभा बालाजी जाधव (रा. मांजरी बुद्रुक, पुणे) यांना दत्तक दिल्याचा आरोप आहे.

# पुणे जिल्हा परिषदेत विषय समित्यांचे आज वाटप; ८३ सदस्यांची होणार निवड

## अध्यक्ष जगदाळे यांच्या अध्यक्षतेखाली पहिली विशेष सभा

**पुणे, ता. १५ :** पुणे जिल्हा परिषदेत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना विषय समित्यांचे वाटप करण्यासाठी आणि विविध समित्यांच्या सदस्यांची निवड करण्यासाठी आज गुरुवारी (ता. १६) एप्रिल रोजी विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेकडे जिल्हा परिषदेमधील महत्त्वाच्या घडामोडी म्हणून पाहिले जात आहे.

या विशेष सभेत सध्या कोणत्याही समितीचा कार्यभार नसलेल्या तीन पदाधिकाऱ्यांना विषय समित्यांची जबाबदारी देण्यात येणार आहे. प्रत्येकी दोन समित्या अशा पद्धतीने एकूण सहा समित्यांचे वाटप करण्यात येईल. यामध्ये अर्थ व शिक्षण, बांधकाम व आरोग्य, तसेच कृषी व पशुसंवर्धन या प्रमुख समित्यांचा समावेश आहे. या समित्यांमुळे जिल्हा परिषदेत विविध कामकाज सुरळीत पार पाडले जाते.




याच सभेत विविध विषय समित्यांवर काम करण्यासाठी एकूण ८३ सदस्यांची निवड केली जाणार आहे. या सदस्यांची निवड प्रक्रिया देखील या सभेतच पूर्ण होणार आहे. त्यामुळे अनेक इच्छुक सदस्यांनी याकडे लक्ष दिले आहे.

ही सभा जिल्हा परिषदेचे नवे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली होणारी ही पहिलीच विशेष सर्वसाधारण सभा असल्यामुळे या बैठकीला विशेष महत्त्व आहे. यापूर्वी झालेल्या दोन विशेष सभांमध्ये प्रशासनातील अधिकाऱ्यांनी अध्यक्षस्थान भूषवले होते. पुणे जिल्हा परिषदेत एकूण दहा विषय समित्या कार्यरत आहेत. यामध्ये अध्यक्षांकडे दोन समित्यांचा कारभार असतो. उर्वरित समित्यांपैकी काही समित्या उपाध्यक्ष आणि इतर सभापतींमध्ये विभागल्या जातात. प्रत्येक पदाधिकाऱ्याला त्यांच्या जबाबदारीनुसार समित्या दिल्या जातात, ज्यामुळे कामाचे नियोजन व्यवस्थित होते.

अध्यक्षांकडे स्थायी समिती आणि पाणी व स्वच्छता संबंधित समितीचा कारभार असतो. उपाध्यक्षांकडे अर्थ व नियोजन आणि शिक्षण या समित्या असतात. बांधकाम समितीचे सभापती बांधकाम आणि आरोग्य या दोन समित्यांचे काम पाहतात. तसेच कृषी समितीचे सभापती कृषी आणि पशुसंवर्धन या समित्यांचे काम पाहतात. याशिवाय समाजकल्याण आणि महिला व बालकल्याण या समित्यांसाठी स्वतंत्र सभापती असतात.

या सर्व समित्या जिल्हा परिषदेच्या कामकाजात महत्त्वाची भूमिका बजावतात. विविध योजनांची अंमलबजावणी, विकासकामे, आरोग्य सुविधा, शिक्षण व्यवस्था आणि कृषी विषयक निर्णय या सर्व बाबी समित्यांमा'त हाताळल्या जातात. त्यामुळे समित्यांचे योग्य वाटप आणि सक्षम सदस्यांची निवड होणे गरजेचे मानले जाते.

समिती सदस्य होण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांना अर्ज करणे आवश्यक आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आज, १६ एप्रिल रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत मुदत देण्यात आली आहे. इच्छुकांनी या वेळेत आपले अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

यानंतर दुपारी ३ वाजता विशेष सर्वसाधारण सभा सुरू होईल. या सभेत समित्यांचे वाटप आणि सदस्यांची निवड या दोन्ही प्रक्रिया पूर्ण केल्या जातील. त्यामुळे आज जिल्हा परिषदेत महत्त्वाचे निर्णय घेतले जाणार आहेत.

एकूणच, या सभेमुळे जिल्हा परिषदेतील कामकाजाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. समित्यांची रचना पूर्ण झाल्यानंतर विविध विकासकामे अधिक प्रभावीपणे राबवली जातील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### अडीच वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्याला अटक

**पिंपरी चिंचवड, ता. १५ :** पिंपरी चिंचवड शहरात माणुसकीला काळीमा फासणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. काळेवाडी परिसरातील एकतानगर भागात अवघ्या अडीच वर्षांच्या चिमुरडीवर एका ४७ वर्षीय व्यक्तीने लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. याप्रकरणी काळेवाडी पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत विजय भोसले नावाच्या संशयित आरोपीला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना दुपारी एक वाजण्याच्या सुमारास घडली. आरोपीने संबंधित लहान मुलीला आंबा खायला देण्याचे आमिष दाखवले आणि तिला स्वतःच्या खोलीत बोलावले. तिथे त्याने या चिमुरडीवर अत्याचार केले. मंगळवारी सकाळी जेव्हा या मुलीला शारीरिक त्रास होऊ लागला, तेव्हा तिच्या पालकांनी तिला तातडीने महापालिकेच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. रुग्णालयातील डॉक्टरांनी मुलीची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर हा सर्व प्रकार उघडकीस आला. पीडित मुलीच्या आईने तिला विश्वासात घेऊन विचारणा केली असता, मुलीने घडलेला प्रकार सांगितला. आरोपीने घरात बोलावून आपल्यासोबत गैरकृत्य केल्याचे तिने सांगितले. घटनेची भीषणता लक्षात घेऊन रुग्णालय प्रशासनाने तातडीने पोलिसांना याबद्दल माहिती दिली.

## दौंड येथील आंबेडकर चौकात मध्यरात्री गोंधळ! ९ जणांवर गुन्हा दाखल

**दौंड, ता. १५ :** शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी (ता. १४) पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. साऊंड सिस्टमवरून सुरू झालेला किरकोळ वाद काही क्षणातच दोन गटांतील उग्र भांडणात परिवर्तित झाला. झोंबाझोंबी, ढकलाढकली आणि आरडाओरड यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. या प्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात ९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांच्या तत्पर हस्तक्षेपामुळे मोठा अनर्थ टळल्याची माहिती समोर आली आहे.

शुभम प्रदीप गव्हाणे, प्रशांत भास्कर सोनवणे, सिंध्दांत अनिल सोनवणे, राहुल शिवाजी शेंडगे, आशिष दिलीप गायकवाड, बुद्धभूषण अनिल



सरोदे, अनिकेत गौतम मिसाळ, सागर गायकवाड व हिमांशू गायकवाड अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक बबन जयवंत जाधव (वय ५४) यांनी सरकारच्या वतीने दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस उपनिरीक्षक बबन जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांवर १३ एप्रिल रोजी रात्री ११ वाजल्यापासून ते १४ एप्रिल सकाळी ९ वाजेपर्यंत रात्रगस्त कर्तव्य सोपवण्यात आले होते. पहाटे सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे तैनात असलेल्या पोलिसांकडून गोंधळ सुरू असल्याची माहिती मिळाली. या ठिकाणी आंबेडकर पुतळ्याच्या बंदोबस्तासाठी पोलीस कर्मचारी व होमगार्ड तैनात होते. त्याचवेळी काही युवक चौकात जमले होते. साऊंड वाजवण्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये जोरदार वाद सुरू झाला. पोलिसांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला, मात्र आरोपींनी पोलिसांचे आदेश धुडकावून लावत एकमेकांवर झडप घातली. काही क्षणांतच परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची चिन्हे दिसू लागली.

दरम्यान, घटनास्थळी अतिरिक्त पोलीस पथक दाखल झाले. पोलीस उपनिरीक्षक, फौजदार, पोलीस कॉन्स्टेबल आणि होमगार्ड यांनी मिळून संबंधितांची झोंबाझोंबी सोडवली आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. जमावाला तात्काळ पांगवण्यात आले. शहरातील संवेदनशील भागात घडलेल्या या घटनेमुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र पोलिसांच्या वेळीच केलेल्या कारवाईमुळे परिस्थिती नियंत्रणात आली.

## शिक्षण म्हणजे अन्यायाविरुद्ध लढण्याचं प्रभावी शस्त्र : डॉ. शिवाजी गायकवाड

**लोणी काळभोर, ता. १४ :** आजचा युवक जर शिक्षणाच्या बळावर आत्मविश्वासाने उभा राहिला, तर तोच उद्याचा सक्षम आणि प्रगत भारत घडवू शकतो. बाबासाहेबांचे शैक्षणिक विचार हे समता, स्वाभिमान आणि मानवी प्रतिष्ठेवर आधारित होते. त्यामुळे शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी माध्यम ठरते. त्यामुळे शिक्षण हे केवळ पदवी मिळवण्याचे साधन नसून ते माणसाला आत्मविश्वास देणारे आणि अन्यायाविरुद्ध बंड करण्याचे सामर्थ्य निर्माण करणारे प्रभावी शस्त्र आहे, असे ठाम प्रतिपादन डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले.

लोणी काळभोर (ता. हवेली) येथील समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या




जयंतीनिमित्त १४ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेत ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त सहभाग आणि विचारांची देवाणघेवाण यामुळे परिसरात वैचारिक वातावरण निर्माण झाले होते.

डॉ. गायकवाड म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मंत्र आजही समाजासाठी मार्गदर्शक आहे. शिक्षणामुळे माणूस स्वतःच्या हक्कांविषयी जागरूक होतो, अन्याय ओळखतो आणि त्याविरुद्ध ठामपणे उभा राहण्याची ताकद मिळवतो. केवळ साक्षरता नव्हे, तर विचारक्षम शिक्षण हे लोकशाहीला बळकट करणारे खरे साधन आहे.


या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास मंजूळकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रप्रेमाचा विशेष उल्लेख केला. डॉ. आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर ते खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्माते होते. भारतीय संविधानाच्या माध्यमातून त्यांनी देशाला एकसंघ ठेवण्याचे ऐतिहासिक कार्य केले. देशाला प्रगत आणि महासत्ता बनवण्याचे त्यांचे स्वप्न आजही आपल्याला प्रेरणा देते, असे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, विद्यार्थिनी मदिहा सय्यद व जान्हवी पवार (बी.ए. भाग १) यांनी आपल्या भाषणातून तसेच गीत गायनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव केला. विद्यार्थ्यांनीही आपल्या मनोगतातून बाबासाहेबांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. डॉ. विजयकुमार घोडके यांनी केली. सूत्रसंचालन प्रा. स्नेहा हिंगमिरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. मुकेश महाले यांनी मानले.

## पुणे विमानतळावर १५ अतिरिक्त फ्लाईट स्लॉट्स वाढविण्यास परवानगी

**पुणे, ता. १५ :** शहराच्या हवाई वाहतुकीसाठी महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. पुणे विमानतळावर १५ अतिरिक्त फ्लाइट स्लॉट्स वाढवण्यात आले असून, एकूण स्लॉट्सची संख्या आता २२० वरून २३५ झाली आहे. या वाढीमुळे प्रवाशांना अधिक सोयीस्कर आणि जलद प्रवासाची सुविधा मिळणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नव्या स्लॉट्समुळे विमान कंपन्यांना अधिक उड्डाणे सुरू करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे पुणे शहराला मंगळुरू, सोलापूर आणि बागडोगरा या नव्या शहरांशी थेट हवाई जोडणी मिळणार आहे. या नव्या मार्गांमुळे पर्यटन, व्यापार आणि उद्योग क्षेत्राला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे सोलापूरसारख्या शहराला थेट हवाई



सेवा मिळाल्यामुळे दक्षिण महाराष्ट्र आणि आसपासच्या भागातील प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. यामुळे वेळेची बचत होऊन प्रवास अधिक सोपा होईल.

या निर्णयामागे केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या प्रयत्नांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले जात आहे. त्यांनी पुणे विमानतळाच्या क्षमतेत वाढ करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता.

सध्या पुणे विमानतळ उडान योजनेअंतर्गत काही महत्त्वाच्या शहरांशी जोडले गेले आहे. आता नव्या उड्डाणांमुळे ही कनेक्टिव्हिटी आणखी मजबूत होणार आहे. तसेच प्रवाशांच्या सोयीसाठी विमानतळावर सुविधा सुधारण्याचे कामही सुरू आहे.


१ मे २०२६ पासून नव्या उड्डाणांचे वेळापत्रक लागू होणार असून, पुणेकरांना अधिक पर्याय उपलब्ध होणार आहेत. या बदलामुळे पुणे शहराचा देशातील हवाई नकाशावर अधिक मजबूत ठसा उमटणार असल्याचे मानले जात आहे.

## स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी सरकार आता देणार २० लाख रुपये

**मुंबई, ता. १५ :** भारतातील छोटे व्यावसायिक आणि नवउद्योजकांसाठी केंद्र सरकार पुन्हा सज्ज झाले आहेत. 'प्रधानमंत्री मुद्रा योजना' आता अधिक व्यापक झाली असून, २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय घोषणेनंतर कर्जाची मर्यादा१० लाखांवरून थेट २० लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. 'स्वयंरोजगारातून राष्ट्रविकास' हे ब्रीदवाक्य घेऊन सुरू झालेली ही योजना आता सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी खऱ्या अर्थाने संजीवनी ठरत आहे.

पारंपारिक बँकिंग व्यवस्थेत कर्ज घेताना छोट्या व्यावसायिकांना मालमत्ता गहाण ठेवण्यापासून ते कागदपत्र जुळवण्यात अनेक अडचणी येत होत्या. हे चित्र बदलण्यासाठी केंद्र सरकारने ही योजना आणली. ज्यांना स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करायचा आहे किंवा असलेल्या व्यवसायाचा विस्तार करायचा आहे, अशांसाठी ही हक्काची आर्थिक मदत आहे.

प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे हे चार टप्पे उद्योजकाच्या व्यवसायातील प्रगतीचा आलेख स्पष्ट करतात. यामध्ये 'शिशू' श्रेणी नवख्या व्यावसायिकांना सुरुवातीचे छोटे भांडवल देऊन उभे करते, तर 'किशोर' आणि 'तरुण' श्रेणी व्यवसाय स्थिर करण्यासाठी आणि मध्यम स्तरावर नेण्यासाठी मदत करतात. आता नव्याने समाविष्ट करण्यात आलेली




'तरुण प्लस' ही श्रेणी विशेषतः अशा अनुभवी उद्योजकांसाठी आहे, ज्यांना आपला जम बसलेला व्यवसाय मोठ्या स्तरावर न्यायचा आहे किंवा अत्याधुनिक यंत्रसामग्रीत गुंतवणूक करायची आहे. या १० ते २० लाखांच्या वाढीव कर्जामुळे आता मध्यम उद्योगांनाही चालना मिळणार आहे.

तुम्ही उत्पादन क्षेत्रात असाल, छोटे दुकानदार असाल किंवा सेवा क्षेत्रात (सलून, टेलरिंग इ.), तुम्ही या कर्जासाठी पात्र आहात. यासाठी तुम्हाला पॅन कार्ड, पत्त्याचा पुरावा, बँक तपशील आणि तुमच्या व्यवसायाचा एक छोटा आराखडा द्यावा लागणार आहे.

कुठे संपर्क साधाल? कोणत्याही सरकारी किंवा खाजगी बँकेत जाऊन तुम्ही 'मुद्रा' कर्जासाठी चौकशी करू शकता. तसेच अधिकृत पोर्टलवर ऑनलाईन अर्जही भरता येतो.

या कर्जाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यासाठी कोणतीही मालमत्ता गहाण ठेवण्याची गरज नसते. शिवाय 'शिशु' कर्जासाठी कोणतीही प्रोसेसिंग फी आकारली जात नाही. ५ वर्षांपर्यंतचा सुलभ परतफेडीचा कालावधी मिळाल्यामुळे उद्योजकांवरील मानसिक दडपण कमी होते. जर तुमच्याकडे व्यवसायाची चांगली कल्पना असेल, तर आता भांडवलाची चिंता सोडून मैदानात उतरण्याची हीच खरी वेळ आहे.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

# भविष्यात रस्त्यावर मोठा संघर्ष होऊ शकतो; संजय राऊत यांचे विधान

**मुंबई, ता. १५ :** महाराष्ट्राच्या फाळणीची मुहूर्तमेढ रोवली जाणार, अशी एक सुप्त भीती महाराष्ट्राच्या मनात आहे, असे विधान शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी केले. तसेच मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावरून भविष्यात मोठा संघर्ष होऊ शकतो असा अंदाजही संजय राऊत यांनी व्यक्त केला.

दिल्लीत झालेल्या पत्रकार परिषदेत संजय राऊत म्हणाले की, मतदारसंघ पुनर्रचनेबाबत खूप आक्षेप आहेत. या विरोधात दक्षिणेतली राज्य एकत्र येत आहेत. यावरून भविष्यात रस्त्यावर मोठा संघर्ष होऊ शकतो. महाराष्ट्रात ७२ जागा होणार आहेत. महाराष्ट्रात ७२ पेक्षा जास्त जागा व्हायला पाहिजेत. विधानसभेच्या ४०० जागा होणार आहेत. या ४०० जागांसाठी नवीन विधानभवन बांधलेले नाहीये. मला अशी भीती वाटते की उद्या ४०० जागा झाल्यावर बहुमताच्या जोरावर महाराष्ट्राचे दोन तुकडे या लोकांनी केले तर त्याची तयारी आहे का? ४०० विधानसभा सदस्य या क्षणी मुंबईच्या विधानभवनात बसायला जागा नाही, मग आम्ही नागपूरमध्ये बसतो तुम्ही मुंबईत बसा अशीही शक्यता आहे. आणि अशा पद्धतीने महाराष्ट्राच्या फाळणीची मुहूर्तमेढ रोवली जाणार, अशी एक सुप्त भीती महाराष्ट्राच्या मनात आहे असे संजय राऊत म्हणाले.



संसदेत आज पुनर्रचनेबाबत चर्चा होईल. राज्यसभेचे विरोधीपक्षनेते मल्लिकार्जून खरगे यांच्याकडे बैठक होणार आहे. त्या बैठकीत या विधेयकावर सर्वानुमते चर्चा होणार आहे. महिला विधेयकाच्या संदर्भात विरोध करण्याचे कारण आम्हाला दिसत नाही. महिलांच्या राजकीय हक्काला विरोध करण्याचे कारण नाही. किंबहुना २०२३ साली जेव्हा हे विधेयक आलं होतं तेव्हाही त्यांना आम्ही पाठिंबा दिला होता. त्यामुळे आता डिलीमिटेशनचा मुद्दा पुढे आला आहे, ती संपूर्ण देशात गंभीर समस्या निर्माण करू शकते.

दुसरी बाब अशी की हे विधेयक मंजूर करण्यासाठी सरकारने अत्यंत चुकीची वेळ निवडली आहे. पाच राज्यात निवडणुका सुरू आहेत आणि या राज्यातले खासदार प्रचारात अडकले आहेत. हे खासदार मतदानासाठी दिल्लीत पोहोचतील की नाही अशी शंका सगळ्यांना आहे. या खासदारांना त्यांच्या राज्यात व्यस्त ठेवून इथे मतदान घ्यायचं. कारण २/३ बहुमताशिवाय हे विधेयक मंजूर होणार नाही. आणि भारतीय जनता पक्षाकडे स्वतःची २४० मतं आहेत, ३६० खासदारांची ताकद या बिलामागे हवी. ही ताकद कशी गोळा करत आहेत, ते पहावं लागेल. हे बिल मे महिन्यातही घेता आलं असतं.

मल्लिकार्जून खरगे यांनी पत्र लिहिले होते की २९ एप्रिल नंतर कधीही या विषयावर अधिवेशन किंवा सर्वपक्षीय बैठक बोलवा. पाच राज्यातील निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यावर तुम्ही आम्हाला चर्चेला बोलवा किंवा विशेष अधिवेशन घ्या आम्ही तयार आहोत, ही जर विरोधी पक्षनेत्यांची भूमिका असेल तर मोदी ऐकायला तयार का नाहीत? याचे एकच कारण आहे पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ, आसाम या राज्यातले खासदार या विधेयकाला मतदान करण्यासाठी किंवा विरोध करण्यासाठी पोहोचू शकणार नाही ही अत्यंत भ्रष्ट मनोवृत्तीचे लक्षण आहे असेही संजय राऊत म्हणाले.

## महामार्गावर नागरिकांना लुटणाऱ्या एका टोळीचा अटक

**पुणे, ता. १५ :** पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात आणि महामार्गावर नागरिकांना लुटणाऱ्या एका सराईत टोळीचा मंचर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. कमी किमतीत सोन्याची बिस्किटे देतो, असे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या सहा आरोपींच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या आहेत.

ही टोळी प्रामुख्याने एकट्या असलेल्या ज्येष्ठ महिला किंवा पुरुषांना आपले लक्ष्य बनवायची. आम्हाला खोदकामात सोन्याची बिस्किटे सापडली आहेत, आम्हाला पैशांची तातडीची गरज आहे, असा बनाव हे गुन्हेगार रचायचे. समोरच्या व्यक्तीला विश्वासात घेण्यासाठी ते सुरुवातीला सोन्याचा एक छोटा तुकडा तपासायला द्यायचे, जो खरा असायचा. मात्र, एकदा का समोरच्या व्यक्तीने मोठी रक्कम किंवा स्वतःचे दागिने दिले, की हे भामटे बनावट सोन्याचे बिस्किटे देऊन पसार व्हायचे.

## संक्षिप्त

### मतिमंद महिलेवर अत्याचार, पर्वती पोलिसांकडून एकाविरुद्ध गुन्हा

**पुणे, ता. १५ :** मतिमंद महिलेवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पर्वती पोलिसांकडून एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत पीडित महिलेच्या वहिनीने पर्वती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, या प्रकरणी एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित ३५ वर्षीय महिला मतिमंद आहे. ती शारिरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम नसल्याची माहिती आरोपीला होती. मंगळवारी (१४ एप्रिल) सायंकाळी पाचच्या सुमारास आरोपीने महिलेला घरात धमकावून नेले. त्याने तिच्यावर बलात्कार केला. महिलेने त्याला विरोध करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्याने तिला मारण्याची धमकी दिली, असे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलीस उपनिरीक्षक पाटील तपास करत आहेत.

### समाज माध्यमातील ओळखीतून महिलेवर अत्याचार

**पुणे, ता. १५ :** समाज माध्मयात झालेल्या ओळखीतून महिलेवर बलात्कार करण्यात आल्याची घटना घडली. या प्रकरणी नांदेड सिटी पोलिसांनी एकााविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका महिलेने नांदेड सिटी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी भोर तालुक्तातील गोगलवाडीत राहायला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित ४२ वर्षीय महिलेची आरोपीशी समाज माध्यमातून ओळख झाली होती. त्यानंतर त्याने महिलेला व्यवसाय करण्याचे आमिष दाखवून मित्राच्या खोलीवर बोलावले. त्याने महिलेशी अश्लील कृत्य केले. महिलेला जाळ्यात ओढून त्याने महिलेवर बलात्कार केला. त्यानंतर महिलेची छायाचित्रे प्रसारित करण्याची धमकी त्याने दिली, असे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस उपनिरीक्षक जया सोनटक्के तपास करत आहेत.

### कवठे यमाई येथे महिलेच्या घरात घुसून विनयभंग

**शिरूर, ता. १५ :** शिरूर तालुक्यातील कवठे यमाई येथे एका विवाहित महिलेच्या घरात घुसून तिचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रा. कवठे यमाई, ता. शिरूर, जि. पुणे यांनी फिर्याद दिली आहे. दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास त्या त्यांच्या घरी एकट्या असताना आरोपी शरीफ उस्मान पिंजारी (रा. कवठे यमाई) हा दारूच्या नशेत घरात घुसला. यावेळी आरोपीने महिलेचा हात पकडून धमकी देत तू कोणाला काही सांगितले तर तुला व तुझ्या मुलीला बघून घेईन असे म्हणत तिची ओढणी ओढली. तसेच अश्लील भाषेत शिवीगाळ करत तिच्या अंगाला हात लावून विनयभंग केला. झटापटीदरम्यान महिलेचे कानातील टॉप्सही पडून हरवले आहेत. महिलेने आरडाओरडा केल्यानंतर तिचे नातेवाईक घटनास्थळी धावून आले. त्यांना पाहताच आरोपी बजाज डिस्कव्हर एमएच १४ डीएस ११३७ या दुचाकीवरून घटनास्थळावरून पसार झाला.

# येरवडा येथे स्कॉर्पिओतून विदेशी दारूची तस्करी उघडकीस

**येरवडा, ता. १५ :** येरवडा येथे स्कॉर्पिओ गाडीतून विदेशी दारूची तस्करीचा डाव लक्ष्मीनगर पोलिसांनी उघडकीस आणला आहे. याप्रकरणी संबंधिताला येरवड्यातील सादलबाबा चौकातून ताब्यात घेण्यात आले आहे. त्याच्याकडून गाडीसह तब्बल २ लाखांची विदेशी दारू, गाडी, मोबाइल असा मिळून २३ लाख ३१ हजारांचा ऐवज जप्त केला आहे.

अंग्रेजसिंग पुरणसिंग गील (वय-३८, रा. रामनगर बोपखेल) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी त्याच्याविरूद्ध लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. अवैध व्यावसायिकांविरूद्ध कठोर कारवाईच्या आदेशानुसार १४ एप्रिलला लक्ष्मीनगर पोलीस हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी पोलीस अमलदार भिमराव कांबळे, अमोल वायाळ यांना मोटारीतून विदेशी दारूची वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाली.




त्यानुसार पोलीस उपायुक्त चिलुमुला रजनिकांत, एसीपी सुनिल जैतापुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने सादलबाबा चौकात सापळा रचला. संशयित वाहन चालकाला अडवून त्याच्या वाहनाची (एम.एच.१४ एल.पी. ७४७४) तपासणी केली. त्यावेळी गाडीच्या डिकीत २ लाखांची विदेशी दारू, मोबाइल, असा २३ लाख ३० हजारांचा ऐवज जप्त केला.

आरोपीने यापुर्वी अशाप्रकारे दारूची तस्करी केली आहे का? त्याने विदेशी दारूचा साठा कोठून मिळवला, यामध्ये इतर आरोपींचा सहभाग आहे का? याद्दष्टीने तपास केला जात असल्याची माहिती लक्ष्मीनगर पोलिसांनी दिली आहे. ही कामगिरी पोलीस आयुक अमितेश कुमार, सहआयुक्त रंजन कुमार शर्मा, अपर आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त चिलुमुला रजनिकांत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र कदम, पोलीस निरीक्षक उमेश गित्ते, एपीआय मिथुन सावंत, एपीआय रविकांत नंदनवार, दत्तात्रय शिंदे, सुरज ओंबासे, अमोल गायकवाड, कादिर शेख, राहुल परदेशी, अतुल जाधव, उगले यांनी केली.

## पुण्यातील नागरिकाची सव्वा कोटींची फसवणूक

**पुणे, ता. १५ :** सोशल मीडियाचा वापर करताना सतर्क राहणे किती महत्त्वाचे आहे, याचे एक धक्कादायक उदाहरण पुण्यात समोर आले आहे. मुंढवा परिसरातील ५८ वर्षीय नागरिकाला फेसबुकवरील एका लिंकवर क्लिक केल्यामुळे तब्बल १ कोटी २२ लाख रुपयांची फसवणूक झाली आहे. या घटनेमुळे सायबर गुन्ह्यांचा धोका पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित नागरिकाला फेसबुकवर एक लिंक दिसली. उत्सुकतेपोटी त्यांनी त्या लिंकवर क्लिक केले. त्यानंतर त्यांना एका व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये जोडण्यात आले. या ग्रुपमध्ये गुंतवणुकीवर मोठा परतावा मिळण्याचे आमिष दाखवण्यात आले. सुरुवातीला चांगला नफा मिळेल असे सांगून आरोपींनी त्यांचा विश्वास संपादन केला. विश्वास बसल्यानंतर आरोपींनी वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे गुंतवण्यास सांगितले. ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ या कालावधीत संबंधित व्यक्तीने टप्प्याटप्प्याने एकूण १ कोटी २२ लाख ४९ हजार रुपये जमा केले. मात्र, नंतर परतावा मागितल्यानंतर कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. तेव्हा आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. यानंतर त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी या प्रकरणी माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेनंतर पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. अनोळखी लिंक, गुंतवणुकीचे आमिष किंवा जादा परताव्याचे आश्वासन देणाऱ्या संदेशांपासून दूर राहावे, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. तसेच कोणत्याही व्यक्तीच्या सांगण्यावरून पैसे पाठवू नयेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना जीवे मारण्याचा कट?

**नागपूर, ता. १५ :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना १०० कोटींची खंडणी मागून ठार मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या प्रकरणाने आता एका अत्यंत धक्कादायक वळण घेतले आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार जयेश पुजारी याच्या प्रेयसीने न्यायालयात दिलेली कबुली केवळ धक्कादायक आहे. बेंगळुरूची ही व्यावसायिक महिला एका सराईत गुन्हेगाराच्या जाळ्यात कशी अडकली आणि तिने या गुन्ह्यात कशी साथ दिली, याचा उलगडा आता झाला आहे.

जयेश पुजारीने गडकरींच्या नागपूर येथील कार्यालयात फोन करून १०० कोटी द्या, नाहीतर बॉम्बने उडवून देऊ, ही त्याची धमकी पोकळ नव्हती, तर त्यामागे पद्धतशीर नियोजन होते. धक्कादायक म्हणजे, तुरुंगात बसून तो बाहेरच्यांशी संपर्कात होता आणि हे सर्व करण्यासाठी त्याला त्याची प्रेयसी मंजुळा मदत करत होती.



मंजुळाने न्यायालयात कबूल केले की, तिनेच गडकरींच्या कार्यालयाचा नंबर शोधून जयेशला दिला होता. इतकेच नव्हे तर मंजुळाने जयेशला कराची विमानतळाचा नंबरही पुरवला होता. एका केंद्रीय मंत्र्याला धमकी देताना पाकिस्तानमधील ठिकाणांचे नंबर देणे, हे या प्रकरणाचे गांभीर्य वाढवणारे आहे.

मंजुळाच्या दाव्यानुसार, जयेशने तिला लग्नाचे आमिष दाखवले होते. मात्र, नंतर जयेश तिला ब्लॅकमेल करू लागला आणि त्याच्या सांगण्यावरून तिने स्वतःचे बँक खातेही खंडणीच्या रक्कमेसाठी वापरण्यास संमती दिली. याप्रकरणी अधिक तपास सध्या पोलिस करत आहेत.

## नाशिकमध्ये शिंदे गटातील नेत्याला संपवण्याचा प्रयत्न

**नाशिक, ता. १५ :** शहरातील सिडको परिसरात मंगळवारी रात्री उशिरा एका राजकीय पदाधिकाऱ्यावर झालेल्या हल्ल्याने खळबळ उडाली आहे. शिवसेना शिंदे गटाचे विभागप्रमुख सुयश पाटील यांच्यावर काही हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने हल्ला केला. या घटनेत ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना सिडकोमधील दत्त चौक परिसरात घडली. सुयश पाटील हे त्यांच्या कार्यालयाबाहेर बसले असताना अचानक काही जण मागून आले आणि त्यांनी हल्ला केला. आरोपींनी कोयत्याने वार करताच परिसरात एकच गोंधळ उडाला. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे पाटील काही क्षण गोंधळले, मात्र त्यांनी स्वतःचा बचाव करत तिथून पळण्याचा प्रयत्न केला.



हल्ल्यात जखमी झाल्यानंतरही त्यांनी मोठ्या धाडसाने हल्लेखोरांच्या तावडीतून सुटका केली. त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान, या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडीओही समोर आला आहे. त्यामध्ये काही हल्लेखोर पाटील यांच्यावर वार करताना दिसत आहेत. पोलिसांनी या फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटवली असून त्यांचा शोध सुरू केला आहे. प्राथमिक तपासात हा हल्ला जुन्या वादातून झाल्याचे समोर येत आहे. मात्र या प्रकरणात इतर कोणते कारण आहे का, याचाही पोलिसांकडून तपास केला जात आहे. अंबड पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या घटनेमुळे सिडको परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. पोलिसांनी आरोपींना लवकरात लवकर अटक करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

## आम्हा सर्वांचं तुमच्यावर प्रेम आहे; राष्ट्राध्यक्ष ट्रम्प पीएम मोदी यांच्यात संवाद

**नवी दिल्ली, ता. १५ :** पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात सुमारे  मिनिटे दूरध्वनीवर सविस्तर चर्चा झाली. विशेष म्हणजे, या संभाषणादरम्यान ट्रम्प यांनी आम्हा सर्वांचं तुमच्यावर प्रेम आहे, असा मैत्रीपूर्ण संदेश मोदींना दिल्याची माहिती अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्गोई गौर यांनी दिली.

अमेरिकाइराण दरम्यान युद्धविराम आणि शांतता चर्चेची पहिली फेरी पार पडल्यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये झालेला हा पहिलाच संवाद ठरला. सुमारे ४० मिनिटांच्या चर्चेत पश्चिम आशियातील संघर्ष, होर्मुझ सामुद्रधुनीतील नाकेबंदी आणि जागतिक सुरक्षेच्या मुद्द्यांवर सखोल विचारविनिमय झाला.




या संवादात होर्मुझ सामुद्रधुनी खुली आणि सुरक्षित ठेवणे किती महत्त्वाचे आहे, यावर दोन्ही नेत्यांनी भर दिला. जागतिक व्यापारासाठी ही सामुद्रधुनी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. तसेच द्विपक्षीय सहकार्य, सामरिक भागीदारी आणि विविध आंतरराष्ट्रीय विषयांवरही चर्चा झाली. पंतप्रधान मोदी यांनी या संवादाची माहिती एक्सवरील पोस्टद्वारे दिली. २०१७ मध्ये ट्रम्प राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर आणि पुन्हा २०२४ मध्ये सत्तेत आल्यानंतर दोन्ही नेत्यांमधील संबंध अधिक दृढ झाल्याचे मानले जाते. या संभाषणातही दोघांनी एकमेकांचा मित्र म्हणून उल्लेख केल्याची माहिती पुढे आली आहे.

दरम्यान, यापूर्वी फेब्रुवारी रोजी दोन्ही नेत्यांमध्ये व्यापार करारावर महत्त्वपूर्ण चर्चा झाली होती, तर २४ मार्च रोजीही द्विपक्षीय व्यापारविषयक निर्णय घेण्यात आले होते. इस्लामाबाद येथील शांतता चर्चा निष्फळ ठरल्यानंतर आणि मध्यपूर्वेतील संघर्ष अद्याप कायम असताना, ट्रम्प मोदी संवादाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## मतदार नोंदणीत निष्काळजी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश

**पुणे, ता. १५ :** पुणे जिल्ह्यात मतदार यादी सखोल पुनरिक्षण कार्यक्रम  २०२६ अंतर्गत काम काजात झालेल्या गंभीर दुर्लक्षावर प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) आणि त्यांच्या पर्यवेक्षकांविरोधात कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले असून, तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

विभागीय आयुक्त, पुणे विभाग तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांच्या बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार, १० एप्रिल २०२६ पर्यंत २००२ च्या मतदार यादीतील मतदारांचा २०२४ च्या यादीत शोध घेऊन टेबल टॉप मॅपिंग आणि प्रोजेनी मॅपिंग ही कामे पूर्ण करणे अपेक्षित होते. यासंदर्भात २०३ भोर विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनीही वेळोवेळी सूचना दिल्या होत्या.



मात्र, कर्णवडी येथील मतदान केंद्र क्रमांक ४०६ साठी नियुक्त बीएलओकडून अपेक्षित काम पूर्ण झाले नसल्याचे समोर आले आहे. १३ एप्रिल २०२६ अखेर टेबल टॉप मॅपिंग केवळ ८५ टक्के पूर्ण झाले असून प्रोजेनी मॅपिंगचे काम पूर्णपणे शून्य असल्याचे स्पष्ट झाले आहे. यावर जिल्हाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. प्रशासनाने संबंधित अधिकारी आणि पर्यवेक्षकांना १५ एप्रिल २०२६ पर्यंत हे काम पूर्ण करण्याचे अंतिम निर्देश दिले आहेत. तसेच, काम पूर्ण न झाल्यास संबंधित बीएलओ विरुद्ध लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० च्या कलम ३२ अंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

याशिवाय, मुदतीनंतरही कामात प्रगती दिसून न आल्यास संबंधितांवर पोलिसांत गुन्हा नोंदवून त्याचा अहवाल तात्काळ सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ही मोहीम वेळेत पूर्ण करणे बंधनकारक असून, कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे.

# कैसा हराया सहर शेख अडचणीत; नगरसेवक पद जाणार?

**ठाणे, ता. १५ :** ठाणे महापालिकेतील एमआयएमच्या नगरसेविका सहर शेख यांनी अधिकाऱ्यांची दिशाभूल करून बनावट जात प्रमाणपत्र मिळवल्याची तक्रार त्यांच्या विरोधात दाखल झाली असून त्यांचे नगरसेवक पद धोक्यात येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

जानेवारी महिन्यात पार पडलेल्या ठाणे महापालिका निवडणुकीत मुंब्रा येथील प्रभाग क्रमांक ३० चर्चेत होता. याच प्रभागातून विजयी झाल्यानंतर सहर शेख यांच्या कैसा हराया या वक्तव्याची राज्यभर चर्चा झाली होती. मात्र, आता निवडणूक लढवण्यासाठी त्यांनी जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी शासकीय यंत्रणांची दिशाभूल केल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे.



तक्रारीनुसार, सहर शेख यांनी निवडणूक लढवताना चार महत्त्वाच्या शासकीय यंत्रणांची दिशाभूल केल्याचा आरोप आहे. त्यांनी मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयातून घेतलेले जात प्रमाणपत्र बनावट कागदपत्रांच्या आधारे मिळवले असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. या प्रकरणात सखोल चौकशी करून फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सहर शेख यांचे वडील युनूस इक्बाल शेख हे मूळचे उत्तरप्रदेशातील गाजियाबाद येथील रहिवासी असून नंतर महाराष्ट्रात स्थलांतरित झाले. स्थलांतरितांसाठी लागू असलेल्या नमुना १० ऐवजी नमुना ८ चा वापर करून अधिकाऱ्यांची दिशाभूल करत जातीचा दाखला मिळवण्यात आल्याचा आरोप आहे. त्यानंतर त्याच आधारे सहर शेख यांनी मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयातून जात प्रमाणपत्र मिळवले आणि ठाणे महापालिकाची निवडणूक लढवली, असा आरोप आहे.

दरम्यान, या संदर्भात ठाणे उपविभागीय अधिकारी कार्यालयात तक्रार दाखल करण्यात आली होती. १८ मार्च रोजी झालेल्या सुनावणीस युनूस शेख अनुपस्थित राहिले, तर त्यांच्या वकिलांनी काही कागदपत्रे सादर केली. त्यानंतर २३ मार्च रोजी झालेल्या सुनावणीत तहसीलदारांनी जात प्रमाणपत्रातील काही त्रुटी निदर्शनास आणल्या. ठाण्यात वास्तव्यास असतानाही मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयातून जात प्रमाणपत्र घेण्यामागील हेतूवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

### कोण आहेत सहर शेख?

सहर शेख सध्या ठाणे महानगरपालिकेत एमआयएमच्या नगरसेविका आहेत. जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या निवडणुकीत सहर शेख ठाण्यातील मुंब्रा परिसरातील प्रभाग क्रमांक ३० मधून निवडून आल्या. निवडणुकीवेळी जाहीर सभेतून सहर शेख आणि तिचे वडील युनूस शेख यांनी मुंब्रातील शरद पवार गटाचे स्थानिक आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर जोरदार शाब्दिक हल्ला चढवला होता.

# निनावी पत्राने खळबळ! सुनेत्रा पवार यांच्या जीवाला धोका?

## रुपाली चाकणकर यांचा सडेतोड पलटवार

**पुणे, ता. १५ :** उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या जीवाला धोका असल्याचा दावा करणारे एक निनावी पत्र बीड पोलिसांना मिळाल्यानंतर राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या पत्रात रुपाली चाकणकर यांच्याकडून धोका असल्याचा उल्लेख करण्यात आल्याचे समोर आले असून, या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून प्राथमिक चौकशी सुरू आहे.

दरम्यान, या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना रुपाली चाकणकर यांनी संबंधित आरोप फेटाळून लावले आहेत. त्यांनी म्हटले की, कोणतीही शहानिशा न करता निनावी पत्र माध्यमांपर्यंत पोहोचवून त्यावरून चर्चा घडवून आणली गेली, हा बदनामी करण्याचा कुटील डाव आहे. हे पत्र नेमके कुणी लिहिले आणि ते माध्यमांपर्यंत कसे पोहोचले, याची सखोल चौकशी झाली



पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

याच पार्श्वभूमीवर, भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणानंतर चाकणकर यांच्यावर विरोधकांकडून विविध आरोप करण्यात आले होते. त्यांच्या आणि खरात यांच्यात आर्थिक संबंध होते का, याची चौकशी करावी तसेच त्यांना अटक करावी, अशी मागणीही करण्यात आली होती. या सर्व घडामोडींमुळे चाकणकर काही काळ माध्यमांपासून दूर राहिल्या होत्या. जवळपास २८ दिवसांनंतर त्यांनी या प्रकरणावर सविस्तर भूमिका मांडली आहे. दरम्यान, बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी स्पष्ट केले की, नाव आणि पत्ता नसलेल्या निनावी पत्राला कायदेशीरदृष्ट्या फारसे महत्त्व देता येत नाही. तरीही, अशा प्रकारचे पत्र कोणी आणि कोणत्या हेतूने लिहिले, याचा तपास होणे आवश्यक आहे. या प्रकरणामुळे राजकीय आरोप-प्रत्यारोपांना पुन्हा सुरुवात झाली असून, निनावी पत्रामागील सत्य बाहेर येण्याची मागणी आता जोर धरत आहे.

# इंदापूरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी; भीम गौरव रॅलीने शहर दुमदुमले

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. १५ : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती इंदापूर शहर व तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे सकाळी ११ वाजता तहसीलदार जीवन बनसोडे व सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत वाघमारे यांच्या हस्ते ध्वजवंदन कार्यक्रम पार पडला. यावेळी त्रिसरण पंचशील बुद्ध वंदना घेऊन गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस तसेच डॉ. आंबेडकर व माता रमाई यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.

या कार्यक्रमास पोलीस निरीक्षक विलास नाळे, मुख्याधिकारी रमेश ढगे, गटविकास अधिकारी सचिन खुडे, जिल्हा परिषदेचे गटनेते श्रीमंत ढोले,



विरोधी पक्ष नेते अनिल पवार, नगरसेवक उमेश मखरे, नगरसेविका अनिता ढावरे, गटनेते शकीलभाई सय्यद, गजानन गवळी, पोपट शिंदे, शुभम पवार, प्रशांत उंबरे, सुधाकर ढगे, संजय शिंदे, अनिकेत वाघ, सागर अरगडे, अक्षय सूर्यवंशी, रिपाइंचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब सरवदे, संदिपान कडवळे, हनुमंत कांबळे, अशोक मखरे, सुहास मखरे, किरण गानबोटे, ड. अविनाश गवळी, तानाजी धोत्रे, पी.पी. पवार, अफसर मोमीन यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरातील साठे नगर, आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक,सरस्वती नगर, शिवाजीनगर, डॉ. आंबेडकर सोसायटी, महात्मा फुले नगर, इंदापूर बस स्थानक, अंबिका नगर, टेंभुर्णी नाका, सावता माळी नगर तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वाचनालय येथे विविध सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते, संघटना यांच्या वतीने जयंती उत्सव साजरा करण्यात आला. इंदापूर बस स्थानक येथे भीम गीतांचा जलसा रंगला, तर विविध ठिकाणी लाडू, पाणी व शीतपेयांचे वाटप करण्यात आले. आंबेडकर सांस्कृतिक भवन येथे भोजनाचीही व्यवस्था करण्यात आली. राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी जयंतीनिमित्त शुभेच्छा देताना बाबासाहेबांच्या विचारांप्रमाणे एकत्र राहण्याचे आवाहन केले. त्यांनी भीम गौरव रॅलीत सहभाग घेतला. नगराध्यक्ष भरत शहा यांनी वाचनातूनच विचार रुजतात असे सांगत शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या संदेशाचे पालन करण्याचे आवाहन केले. भाजपा नेते प्रदीप गारटकर व प्रवीण माने यांनीही बाबासाहेबांच्या शिकवणीवर चालण्याचा संकल्प व्यक्त केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष अजय मखरे, उपाध्यक्ष संघर्ष मखरे, रोहन मखरे, खजिनदार अजय कांबळे, सहखजिनदार अनिकेत खरात, सचिव सिद्धार्थ गाडे, सहसचिव सुनील शेळकेव कार्याध्यक्ष विशाल मखरे यांनी कार्यक्रम व भीम गौरव रॅलीसाठी विशेष परिश्रम घेतले. दरम्यान, आंबेडकर नगर येथून निघालेल्या भीम गौरव रॅलीने शहरातील प्रमुख मार्ग व्यापले. विविध महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करत युवक-युवतींसह भीमसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. जय भीमच्या घोषणांनी संपूर्ण इंदापूर शहर दुमदुमून गेले.

# १ मेपासून रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी बंधनकारक : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई, ता. १५ :** राज्यात परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी १ मे (महाराष्ट्र दिन) पासून मराठी भाषा येणे अनिवार्य करण्यात येणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी मोटार परिवहन विभागामार्फत राज्यातील ५९ प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांतून विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेदरम्यान संबंधित चालकांना मराठी भाषा लिहिता व वाचता येते का, याची पडताळणी केली जाणार आहे. मराठीचे ज्ञान नसलेल्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील, असा इशाराही सरनाईक यांनी दिला आहे.



सरनाईक यांनी सांगितले की, रिक्षा किंवा टॅक्सी परवाना देताना स्थानिक भाषेचे ज्ञान असणे हा नियम पूर्वीपासूनच अस्तित्वात आहे. मात्र, मुंबई महानगर क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांसारख्या शहरांत अनेक चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधता येत नाही किंवा काही जण जाणूनबुजून मराठी बोलणे टाळतात, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणावर प्राप्त झाल्या आहेत.


ज्या प्रदेशात आपण राहतो त्या प्रदेशाची भाषा व्यवसायासाठी शिकणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपल्या मातृभाषेचा अभिमान जितका आवश्यक आहे, तितकाच इतर राज्यात व्यवसाय करताना त्या राज्याच्या भाषेचा आदर करणेही महत्त्वाचे आहे, असे सरनाईक यांनी स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर १ मेपासून सर्व परवानाधारक चालकांना मराठी लिहिता व वाचता येणे बंधनकारक करण्यात येणार आहे. नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. तसेच नियमांकडे दुर्लक्ष करून चुकीच्या पद्धतीने परवाने देणाऱ्या परिवहन अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

# यवत येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. १५ : भारतरत्न, महामानव, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सर्वत्र साजरी होत असताना यवत येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दरवर्षीप्रमाणे यंदाही उत्साहात साजरी करण्यात आली. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती कार्यक्रमाचे आयोजन पंचशील तरुण मंडळ व संविधान विचार मंच यांच्या वतीने करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यवत येथील भीमनगर



सांस्कृतिक भवन व ग्रामपंचायत कार्यालय, आनंदग्राम सोसायटी येथे प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी अनेकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या देशासाठी केलेल्या बहुमूल्य कार्याची माहिती दिली.

ग्रामविकास अधिकारी बालाजी सरवदे, ग्रामीण रुग्णालयाचे राहुल गेवारे यांनी मनोगत व्यक्त केले. यवत ग्रामपंचायतच्या वतीने भीम नगर येथे नव्याने उभारण्यात आलेल्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाच्या बांधकाम ाबद्दल ग्रामपंचायत प्रशासनाचे व ग्रामस्थांच्या आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी यवत ग्रामपंचायतचे सरपंच समीर दोरगे,उपसरपंच सुभाष यादव, जिल्हा परिषद सदस्य अविनाश कुद्ळे , झोपडपट्टी सुरक्षा दलाचे जिल्हाध्यक्ष दत्ता डाडर, वंचित बहुजन आघाडीचे नेते उत्तमराव गायकवाड. विद्या विकास विद्यालय मुख्याध्यापक सतीश सावंत. पशुसंवर्धन विभागाचे डॉ. संतोष बडेकर यांसह विविध संघटनेचे पदाधिकारी, ग्रामपंचायतचे आजी - माजी सदस्य, महिला भगिनी, संविधान विचार मंच व पंचशील तरुण मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## आरोग्याच्या दृष्टीने रोज कच्चा लसूण का खायला हवा, जाणून घ्या..

आपल्याकडे आहारात लसूण हा हमखास वापरला जातो. लसूण हा आपल्या आरोग्यासाठी फार महत्त्वाचा मानला जातो. तुमच्या आहारात लसणाचा अनेक प्रकारे समावेश करू शकता. अर्ध्या पाकळीने सुरुवात करा आणि हळूहळू अख्ख्या पाकळीपर्यंत प्रमाण वाढवा. लसणाचा वास आणि चव तीव्र असल्यामुळे, तुम्ही त्याचे लहान तुकडे करूनही खाऊ शकता, ज्यामुळे ते खाण्यास सोपे जाते. तुम्ही ते मधात बुडवून कोमट पाण्यासोबतही खाऊ शकता.

सर्दी आणि खोकल्याच्या समस्येत आले आणि लसूण यांचे मिश्रण आपल्यासाठी उपयुक्त ठरते. आले आणि लसूण यांचा उष्ण प्रभाव असतो, तो खाल्ल्याने शरीरात उष्णता निर्माण होते तसेच सर्दी आणि तापापासून खूप आराम मिळतो. आलं लसूण एकत्र खाल्ल्याने घसा खवखवणे कमी होण्यास मदत होते तसेच नाकातून पाणी येणे आणि सर्दी होणे यापासून आराम मिळतो.

बहुतेक हिंदुस्थानातील घरांमध्ये आलं आणि लसूण हे हमखास वापरले जातात. त्यात अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म आहेत. यामुळे कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो. आलं लसूण आहारात असल्याने, रक्ताभिसरणही वेगाने वाढते. आलं लसूण एकत्र खाल्ल्यामुळे केवळ रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. केवळ इतकेच नाही तर, हृदयाशी संबंधित आजारांचा धोकाही मोठ्या प्रमाणात कमी होतो. आले आणि लसूण एकत्र खाणे आपल्या हृदयासाठी सुद्धा फायदेशीर आहे. यामुळे वजन सहज कमी होते आणि कोलेस्टेरॉलची पातळी देखील कमी होते. यामुळे एथेरोस्क्लेरोसिसचा धोका कमी होतो. तसेच आपला रक्तदाब नियंत्रित राहतो, ज्यामुळे स्ट्रोक आणि हृदयविकाराचा धोका बऱ्याच प्रमाणात कमी होतो.

आले आणि लसूण एकत्र खाल्ल्याने कर्करोगाशी लढण्यास मदत होते. या मिश्रणात अँटी-ऑक्सिडंट्स आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म आहेत, जे कर्करोगाच्या पेशींना नुकसान पोहोचवून कर्करोगाचा धोका कमी करण्यास मदत करतात.

आले आणि लसूणमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात; ते खाल्ल्याने हात आणि पाय दुखण्यापासून आराम मिळतो तसेच शरीरातील सूज दूर होते. आले आणि लसूणमध्ये आढळणारे गुणधर्म संधिवाताची लक्षणे कमी करण्यास देखील उपयुक्त ठरतात.

# लोकसभेच्या जागा ५४५ वरून ८५० होणार; संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयक सादर

**दिल्ली, ता. १५ :** देशातील लोकप्रतिनिधित्व अधिक व्यापक आणि समतोल करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने लोकसभेतील जागा वाढवण्याचा महत्त्वाचा प्रस्ताव तयार केला आहे. सध्याच्या ५४५ जागांऐवजी लोकसभेची एकूण संख्या ८५० करण्याचा प्रस्ताव असून, यासाठी संविधान (१३१वा दुरुस्ती) विधेयक २०२६ संसदेत मांडले जाणार आहे. अर्जुन राम मेघवाल यांच्या माध्यमातून हे विधेयक सादर होणार आहे. या नव्या रचनेनुसार ८१५ जागा राज्यांसाठी आणि ३५ जागा केंद्रशासित प्रदेशांसाठी राखीव असतील.



या विधेयकामुळे लोकसभेच्या संरचनेत मोठा बदल होणार आहे. वाढती लोकसंख्या, शहरीकरण आणि राज्यांमधील लोकसंख्येतील असमतोल लक्षात घेऊन प्रतिनिधित्व वाढवण्याचा उद्देश ठेवण्यात आला आहे. यासाठी भारतीय संविधानाचा अनुच्छेद ८१ मध्ये सुधारणा करण्यात येणार असून, लोकसंख्येची नवी व्याख्या निश्चित केली जाईल. संसदेद्वारे मान्य झालेल्या जनगणनेच्या आधारावरच जागांचे वाटप ठरणार आहे.

डिलिमिटेशन प्रक्रियेतही मोठे बदल सुचवण्यात आले आहेत. जागांचे पुनर्निर्धारण करण्याची जबाबदारी भारत निवडणूक आयोग यांच्याकडे स्पष्टपणे सोपवली जाणार आहे. तसेच २०२६ नंतरच्या जनगणनेची अट शिथिल करून ही प्रक्रिया अधिक गतिमान आणि लवचिक करण्याचा प्रयत्न आहे.

या प्रस्तावामुळे महिला आरक्षणालाही चालना मिळणार आहे. नारी शक्ती वंदन अधिनियम अंतर्गत लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये ३३ टक्के जागा महिलांसाठी राखीव केल्या जाणार आहेत. डिलिमिटेशननंतर या जागांचे रोटेशन केले जाईल आणि आरक्षणाची मुदत १५ वर्षे असेल.

याशिवाय ईशान्य भारतातील अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोरम आणि नागालँड या राज्यांमध्ये अनुसूचित जमातींचे प्रतिनिधित्व कायम राखण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्रिपुरामध्येही सध्याचे प्रमाण कायम ठेवण्याचा प्रयत्न आहे.

नवीन तरतुदी लागू होईपर्यंत सध्याची लोकसभा आणि विधानसभांची रचना कायम राहणार आहे. डिलिमिटेशन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच नव्या जागा आणि रचना लागू करण्यात येणार असल्याने प्रशासनात सातत्य राहील. या विशेष अधिवेशनात जागा वाढवण्यासोबतच डिलिमिटेशन विधेयक २०२६ आणि केंद्रशासित प्रदेश कायद्यातील बदलही मांडले जाणार आहेत.

## किरकोळ कारणावरून एकाला मारहाण

**शिरूर, ता. १५ :** शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथील फाकटे रोड परिसरात घरात घुसून लोखंडी पाईप अन् लाकडी काठ्या व बेल्टने मारहाण केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार शरीफ उस्मान पिंजारी वय ३३, व्यवसाय गादी विक्री, रा. फाकटे रोड, कवठे येमाई, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास ते त्यांच्या घरी असताना आरोपी सुदाम इचके, शुभम सुदाम इचके, भाऊ इचके, कैलास बच्चे व केतन माटे यांनी अनधिकृतपणे घरात प्रवेश केला. पाणी मागण्याच्या किरकोळ कारणावरून राग मनात धरून आरोपींनी बेकायदेशीर जमाव करून लोखंडी पाईप, लाकडी काठ्या, चामडी बेल्ट तसेच हाताने व लाथाबुक्क्यांनी तक्रारदारास मारहाण केली.

# माऊलींच्या पालखी सोहळ्याचे वेळापत्रक लांबणीवर!

### पंढरपूरात होणार निर्णायक बैठक, वारकऱ्यांची उत्सुकता शिगेला

**पुणे, ता. १५ :** आळंदी येथून दरवर्षी निघणाऱ्या संतश्रेष्ठ संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या वेळापत्रकाबाबत यंदा अनिश्चितता निर्माण झाली आहे. वारकऱ्यांमध्ये या वेळापत्रकाची मोठी उत्सुकता असतानाच ते जाहीर होण्यास उशीर होणार असल्याची माहिती समोर आली आहे.



मुळात हे वेळापत्रक १३ एप्रिल रोजी जाहीर होणार होते. मात्र काही नियोजनाशी संबंधित अडचणींमुळे हा निर्णय पुढे ढकलण्यात आला आहे. श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान समिती यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्यातील भवानी पेठेतील विठ्ठल मंदिरात ९ आणि १० जुलै रोजी पालखीचा मुक्काम होणार आहे. मात्र त्या ठिकाणी वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा आणि व्यवस्थेबाबत अद्याप स्पष्ट आणि लेखी प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. वारकऱ्यांच्या सोयी-सुविधांची खात्री देता येत नसल्याने वेळापत्रक जाहीर करण्यास संस्थानने सध्या स्थगिती दिली आहे. या संदर्भात मंदिर प्रशासनाला काही सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र १२ एप्रिलपर्यंत त्यावर कोणतेही ठोस उत्तर मिळाले नसल्याने हा निर्णय पुढे ढकलावा लागल्याचे संस्थानकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी लवकरच एक महत्त्वाची बैठक आयोजित केली जाणार आहे. या बैठकीत प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, मंदिर प्रशासन, दिंडी प्रमुख आणि संस्थानचे सदस्य सहभागी होणार आहेत. पुढील ८ दिवसांत ही बैठक पार पडणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

यानंतर अंतिम निर्णय २६ एप्रिल रोजी पंढरपूर येथे होणाऱ्या बैठकीत वारकरी समाजासमोर मांडला जाणार आहे. सर्व बाबींचा विचार करून १ मे रोजी आळंदी येथे पालखी सोहळ्याचे अंतिम वेळापत्रक जाहीर केले जाईल, अशी माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली आहे.

## महिला आरक्षण विधेयक ही काळाची गरज : अमित शहा

**नवी दिल्ली, ता. १५ :** महिला आरक्षण विधेयक ही केवळ औपचारिकता नसून ती काळाची गरज आहे. हा एक असा ऐतिहासिक बदल आहे, जो कोणत्याही विलंबाशिवाय चांगल्यासाठीच व्हायला हवा, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी केले. संसदेच्या आगामी विशेष अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी सर्व राजकीय पक्षांना या महत्त्वाच्या निर्णयाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे.



सप्टेंबर २०२३ मध्ये संसदेने नारी शक्ती वंदन अधिनियम मंजूर केला, ज्याद्वारे लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित करण्याची तरतूद करण्यात आली.

मात्र, मूळ कायद्यानुसार हे आरक्षण २०२७ ची जनगणना आणि त्यानंतरच्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर, म्हणजेच साधारण २०३४ पूर्वी लागू होणे कठीण होते. आता सरकारने २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासूनच याची अंमलबजावणी करण्याचा निर्धार केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही एका लेखाद्वारे या घटनादुरुस्तीचे महत्त्व अधोरेखित केले असून, पुढील दोन दिवसांत यावर सकारात्मक चर्चा होऊन विधेयक मंजूर होईल, अशी आशा व्यक्त केली आहे. महिलांचे कायदेमंडळातील प्रतिनिधित्व वाढवण्याच्या दृष्टीने हे पाऊल मैलाचा दगड ठरणार आहे.

## खराडीत सिक्युरिटी गार्डची हत्या

**पुणे, ता. १५ :** पुण्यातील खराडी परिसरात क्षुल्लक कारणावरून घडलेल्या वादातून एकाची हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रात्रपाळीत काम करत असताना आधी कोण झोपणार? या कारणावरून दोन सुरक्षारक्षकांमध्ये वाद होऊन त्याचे रूपांतर थेट हत्येत झाले.




पांडुरंग खारवणे (वय ५२, रा. मांजरी बुद्रुक) आणि सुदर्शन काळे (वय २२, रा. खराडी) हे दोघे एका सोसायटीत सिक्युरिटी गार्ड म्हणून काम करत होते. १२ एप्रिल रोजी रात्री दोघांची एकत्र रात्रपाळी होती. त्यांनी रात्री १२ ते सकाळी ६ या वेळेत आळीपाळीने ३-३ तास झोप घेण्याचे आधीच ठरवले होते. मात्र रात्री उशिरा आधी कोण झोपणार? यावरून दोघांमध्ये बाचाबाची सुरू झाली.


सुरुवातीला साधा वाद असलेला हा प्रकार हळूहळू चिघळत गेला. दोघांमध्ये जोरदार वादावादी झाली आणि रागाच्या भरात सुदर्शन काळे याने आपल्या गळ्यातील गमजा काढून खारवणे यांच्या गळ्याला घट्ट आवळला. या घटनेत खारवणे काही क्षणातच खाली कोसळले आणि बेशुद्ध झाले.

घडलेला प्रकार पाहून आरोपी घाबरला आणि त्याने स्वतः पोलीस कंट्रोल रूमला फोन करून माहिती दिली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत खारवणे यांना रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासल्यानंतर त्यांना मृत घोषित केले.

या प्रकरणी पोलिसांनी सुदर्शन काळे याला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. क्षुल्लक कारणावरून घडलेल्या या घटनेमुळे संताप आणि चिंता व्यक्त केली जात असून अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्याची गरज व्यक्त होत आहे.

## पुण्यातील झेड ब्रिजवर स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्याला लुटणाऱ्या दोन आरोपींना अटक

**पुणे, ता. १५ :** शहरातील झेड ब्रिज परिसरात घडलेल्या एका घटनेने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या भाऊ-बहिणीला काही तरुणांनी धमकावून लुबाडल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोघा आरोपींना अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना १० एप्रिल रोजी पहाटे सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास घडली. िर्यादी तरुण हा स्पर्धा परीक्षेची तयारी करत असून तो आपल्या नातेवाईक मुलीसोबत झेड ब्रिज परिसरात िरायला गेला होता. ते दोघे नदीपात्राच्या रस्त्याने जात असताना दुचाकीवरून काही तरुण तेथे आले.


आरोपींनी कोयत्याचा धाक दाखवत त्यांना अडवले आणि पैशांची मागणी केली. तरुणाला धमकावत त्याच्या मोबाईलमधून ऑनलाइन व्यवहार करून १ हजार रुपये एका खात्यावर ट्रान्स'र करण्यास भाग पाडले. तसेच दोघांनाही मारहाण करण्यात आली. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेले.

या घटनेनंतर तरुणाने डेक्कन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यातून आरोपींची ओळख पटवण्यात यश आले. नंतर पोलिसांनी दोघांना अटक केली.

या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. झेड ब्रिजसारख्या गर्दीच्या ठिकाणीही अशा घटना घडत असल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. पोलिसांनी नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले असून अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर कडक कारवाई केली जाईल, असे सांगितले आहे.

## सांडपाणी नदीत सोडणाऱ्या सोसायटीला एक लाखाचा दंड

**पिंपरी, ता. १५ :** सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) बंद ठेवून थेट पवना नदीत सांडपाणी सोडणाऱ्या रावेत येथील एका गृहनिर्माण सोसायटीवर महापालिकेने कारवाई केली आहे. पर्यावरण विभागाच्या पथकाने एक लाख दोन हजार ५०० रुपयांचा दंड सोसायटीला आकारला आहे. सात दिवसांत दंड न भरल्यास पाण्याचे नळजोड बंद करण्याचा इशारा दिला आहे.



शंभरहून अधिक सदनिका असलेल्या गृहनिर्माण सोसायट्या, दररोज वीस हजार लिटर पाण्याचा वापर करणाऱ्या औद्योगिक, व्यापारी, सरकारी व निमसरकारी संस्थांना पाण्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रीकरण करणे बंधनकारक आहे. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) कार्यान्वित न करणाऱ्या सोसायट्या आणि आस्थापनांवर महापालिकेने कारवाई हाती घेतली आहे. रावेत येथे ३४५ सदनिका असलेली मोठी सोसायटी आहे.

या सोसायटीमधील सांडपाणी प्रकल्प बंद आहे. सोसायटीमधील सांडपाणी थेट पवना नदीत सोडण्यात आले होते. या बाबत महापालिकेच्या पर्यावरण विभागाला तक्रार प्राप्त झाली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेऊन पथकाने पाहणी केली.

या पाहणीत संबंधित सोसायटीचा सांडपाणी प्रकल्प बंद असल्याचे निदर्शनास आले. तसेच, कोणतीही प्रक्रिया न करता सांडपाणी थेट पवना नदीत सोडले जात असल्याचे आढळले. त्यामुळे पर्यावरण विभागाच्या पथकाने नदीत सोडण्यात येणारे पाणी बंद केले. सोसायटीला एक लाख दोन हजार ५०० रुपयांचा दंड आकारला. सोसायटीधारकांनी सात दिवसांत दंड न भरल्यास पाण्याचे नळजोड बंद करण्याचा इशारा पर्यावरण विभागाचे कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांनी दिला आहे.

## महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत पारा ४० अंशांच्या पार

**पुणे, ता. १५ :** महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा चटका सातत्याने वाढत असून आज, १५ एप्रिल २०२६ रोजी राज्याच्या अनेक भागांत तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार गेला आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, विदर्भातील अकोला, अमरावती आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये उष्णतेची तीव्र लाट असून अकोल्यात ४३.८ अंश सेल्सिअस इतक्या उच्चांकी तापमानाची नोंद झाली आहे. मराठवाड्यातही सूर्य आग ओकत आहे.




राज्यातील हवामानात झालेल्या या बदलामुळे प्रशासनाने नवी नियमावली जाहीर केली आहे. विशेषतः दुपारी १२ ते ४ या वेळेत बाहेरील कष्टाची कामे करण्यावर बंदी घालण्यात आली असून, असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. उष्णतेच्या लाटेमुळे आरोग्यावर होणारे परिणाम टाळण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. विदर्भ आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला असून, आगामी ७२ तास हवामान आव्हानात्मक राहण्याची शक्यता आहे.

कोकण किनारपट्टीवरील मुंबई, ठाणे आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये तापमानापेक्षा दमट हवामानाचा त्रास अधिक जाणवत आहे. आर्द्रतेचे प्रमाण जास्त असल्याने मुंबईकरांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे. येथील कमाल तापमान जरी ३५ अंशांच्या आसपास असले, तरी हवेतील ओलावा अधिक असल्याने उन्हाच्या झळा जास्त तीव्रतेने जाणवत आहेत.

दुसरीकडे, शेतकऱ्यांसाठी चिंतेची बाब म्हणजे अंदाजानुसार, जून ते सप्टेंबर या काळात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. सध्याच्या कडक उन्हामुळे पाणीसाठ्यातही झपाट्याने घट होत असून पुणे आणि नाशिकसारख्या शहरांमध्ये पाणी कपातीचे संकट ओढवले आहे. नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा आणि उष्माघातापासून स्वतःचा बचाव करावा, असे आवाहन राज्य सरकारने केले आहे.

# आदित्य ठाकरेंना कार्याध्यक्षपद देण्याची चर्चा : खासदार संजय राऊत

**मुंबई, ता. १५ :** शिवसेना (उद्धव ठाकरे) यांच्या पक्षात जून महिन्यात संघटनात्मक बदल होणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. या बदलांमध्ये नेतृत्त्वांत बदल होऊन आदित्य ठाकरेंना यांना कार्याध्यक्ष पद मिळणार असल्याचीही चर्चा आहे. या चर्चेवर संजय राऊत यांनी अत्यंत सुचक उत्तर दिलंय. त्यामुळे येणाऱ्या काळात शिवसेनेचं नेतृत्त्व तरुणांच्या हाती जाणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. संजय राऊत आज पत्रकारांशी बोलत होते.



संजय राऊत म्हणाले, माध्यमातील माहिती आणि तुम्ही प्रश्न विचारत आहात त्यावर मी उत्तर देतोय की तरुण पिढीचं स्वागत केलं पाहिजे. तरुण पिढीच्या हाती नेतृत्व देताना या सर्व गोष्टींचा विचार केला पाहिजे की पुढलं राजकारण तरुणांच्याच हातात जायला पाहिजे, हे लक्षात घेतलं पाहिजे.

आदित्य ठाकरे महाराष्ट्रभर फिरत नाहीत, त्यामुळे इतर कोणाला कार्याध्यक्ष केल्यास ते महाराष्ट्रभर फिरतील तरी असं तुमचेच खासदार खासगीत बोलतात असं पत्रकारांनी विचारल्यावर संजय राऊत म्हणाले, खासगीमध्ये बोलण्याला अर्थ नसतो. पक्षाच्या संघटनेत चर्चा होत असते. मुंबई महापालिका किंवा इतर महापालिकांच्या निवडणुकीत आदित्य ठाकरेंनी उत्तम काम केलंय. त्यांच्या तरुणांच्या टीमने उत्तम काम केलंय. संजय राऊतांच्या या विधानामुळे आदित्य ठाकरेंवरील जबाबदारी आता लवकरच वाढणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

दिल्लीत विधान परिषदेवर चर्चा का व्हावी असा प्रतिप्रश्न त्यांनी विचारला. ते पुढे म्हणाले, महिला आरक्षणाचा विषय आहे. डिलिमिनेशनचा विषय आहे. या मुळे उत्तर विरुद्ध दक्षिण असा संघर्ष सुरू झाला आहे. मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी सरकारला इशारा दिला आहे. हा अत्यंत गंभीर विषय आहे. विधान परिषदेवर चर्चा करायला आपल्याकडे बराच वेळ आहे.

### महिला आरक्षण विधेयकावर भूमिका काय?

महिला आरक्षण विधेयकावर तुमची भूमिका काय आहे? प्रियंका चतुर्वेदी, किशोरी पेडणेकर यांनी मिस कॉल दिला. मिस कॉल हा मिस कॉलच असतो. तुम्ही मिसकॉलचं एवढं काय घेऊन बसलात. महिला आरक्षण विधेयकाबाबत सुरुवातीपासून शिवसेनेची भूमिका स्पष्ट आहे. महिलेच्या राजकीय हिताआड शिवसेना कधी आलेली नाही, येणार नाही. महाराष्ट्राचं म्हणाल तर महाराष्ट्र हे पहिल राज्य आहे, जिथे महिला राजकीय आरक्षणाची स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मुहूर्तमेढ रोवली गेली.